PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Aai
Year: 1981

Song: Ag Holi punvala zumbad
Lyricist: Jagdish Khebudkar

अगं होळी पुनवंला झुंबड उठली
अन् टिपूरं चांदणं पडलं गं हा
होळी पुनवंला झुंबड उठली
अन् टिपूरं चांदणं पडलं गं
कलगीसंग तुरा मांडतो
इपरीत सारं घडलं गं
गं गं गं गं
हे इपरीत सारं घडलं गं
इपरीत सारं घडलं
माझ्या राणी तू गं
हा माझ्या सजणी तू गं
ए हे हे हे
हे हे हे हे हे हा

ठण ठण वाजतंय गळ्यामधी
ठण ठण वाजतंय गळ्यामधी
माझ्या राजा तू रं
माझ्या सर्जा तू रं
ए हे हे हे
हे हे हे हे हे हा

अगं नमनामधी ही रात चालली
तेल जळतंया फुकाफुकी गं हां
अगं नमनामधी ही रात चालली
न् तेल जळतंया फुकाफुकी
सवाल करतो जबाब द्यावा
होऊन जाऊ दे झकाझकी
गं गं गं गं
होऊन जाऊ दे झकाझकी
होऊन जाऊ दे झकाझकी
माझ्या मैने तू गं
हा माझ्या सजणे तू गं
ए हे हे हे
हे हे हे हे हे हा

अगं ऐक सवाल
अगं आईपोटी पोर जन्मतं
अनुभव येतो दूनियेत गं हा
अगं आईपोटी पोर जन्मतं
अनुभव येतो दुनियेत
पण बापापोटी पुत्र जन्मला
कुठं घडं हे आक्रित
गं गं गं गं
ए कुठं घडं हे आक्रित
कुठं घडं हे आक्रित
हे माझ्या नारी तू गं
हे माझ्या सजनी तू गं
ए हे हे हे
हे हे हे हे हे हा

अरे पुराणातला जुना दाखला
पोरा सोरांना शिकीव जा
दीड दमडीचं शहानपण येड्या
दीड शहाण्याला दाखिव जा
जगावेगळं घडलं म्हणूनी
नवाल वाटतंय तुला मला हो...
जगावेगळं घडलं म्हणूनी
नवाल वाटतंय तुला मला

श्री इस्णूच्या बेंबीमधनं
बरम देव तो जलमला
रं रं रं रं
बरम देव तो जलमला
बरम देव तो जलमला
माझ्या राघू तू रं
माझ्या राजा तू रं
ए हे हे हे
हे हे हे हे हे हा

ऐका
अरे लई शिकून तू दिवं लावलं
अनुभव नाही कवडीचा
आ... हो
लई शिकून तू दिवं लावलं
अनुभव नाही कवडीचा
कालेजामधी अभ्यास करूनी
रूबाब करतो दमडीचा
रूबाब करतो दमडीचा
रूबाब करतो दमडीचा
आता साऱ्यांच्या आवडीचा
अन् पेशल माझ्या निवडीचा
आता साऱ्यांच्या आवडीचा
अन् पेशल माझ्या निवडीचा
जाता जाता गिरकी घेऊन
सवाल करते आकडीचा
रं रं रं रं
हे सवाल करते आकडीचा
सवाल करते आकडीचा
माझ्या राजा तू रं

माझ्या सर्जा तू रं
ए हे हे हे
हे हे हे हे हे हा
विज्ञानानं कशी घेतली
झेप ही साऱ्या विश्वात
उपग्रहाचा गरूड सोडला
वर्षामागून वर्षात
आरं कोसळून त्यो पडंल म्हणूनी
साऱ्यांनी धसका घेतला रं
शास्त्रज्ञांचा खरा पराक्रम
उभ्या जगाला पटला रं
उभ्या जगाला पटला रं
उभ्या जगाला पटला रं
एका मागून एक सोडली
माळ ग्रहाची आभाळी
आपआपल्या वाटंनं फिरती
गुमान साऱ्या अंतराळी
गुमान साऱ्या अंतराळी
गुमान साऱ्या अंतराळी
भीती नाही की धसका नाही
निवांत दुनिया घरामधी
जगावेगळा शास्त्रज्ञाचा
बाप कोण ह्यो जगामधी
रं रं रं रं
ऐ बाप कोण ह्यो जगामधी
बाप कोण ह्यो जगामधी
माझ्या सजणा तू रं
हे माझ्या राजा तू रं
ए हे हे हे
हे हे हे हे हे हा

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*